# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/१०/२०१६

**१) आम रस्त्यावरील सोलर लाईटच्या बॅटरीची चोरी . :–**

दिनांक ०९+१०/१०/२०१६ चे रात्र दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने खुर्शिपार येथे ग्रामपंचायत तर्फे सार्वजनिक रोडवर लावलेल्या २ सोलर लाईटच्या बॅटऱ्या अंदाजे कि. १०,०००/—रू. चे चोरून नेल्याने फिर्यादी पुरूषोत्तम रामनाथ मदनकर वय २५ वर्ष रा. खुर्शिपार यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) मुलीला वडीलाने जिवाने ठार मारल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी सौ. मनिषा डाकराम घोडमोडे वय २५ वर्ष रा. गोसे ह.मु. बोरडा ही पाण्याचा गुंड घेवुन आली त्यावेळी तिचे पती आरोपी याने फिर्यादी हीचे सोबत घरगुती कारणावरून तिची मुलीचा गळा दाबुन कु. परीधी वय १.५ वर्ष हिला जिवाने ठार मारल्याचे संशय व्यक्त केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ ला मर्ग क्र. २६/१६ कलम १७४ जाफौ. चे तपासावरून आरोपीने मुलीचा गळा दाबुन जिवाने ठार मारल्याचे निष्पन्न झाल्याने व प्राप्त मृतकचे पी.एम. रिपोर्ट वरून चौकशी अहवाल सरतर्फे फिर्यादी सपोनी. नेवारे यांचे रिपोर्ट वरून पोस्टे. अडयाळ येथे कलम ३०२ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. नेवारे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**३) एसटी मधुन लोखंडी ट्रे मधील तिकीटांची चोरी . :–**

दिंनाक. १०/१०/२०१६ रोजी २१.५३ वा. दर. यातील फिर्यादी हे अजय पुरण नागदेवे वय ३४ वर्ष रा. कोरंभी (एसटी वाहक भंडारा) हा वाहक म्हणुन कर्तव्यावर असलेल्या बस क्र. एमएच ४० वाय ५५९० मध्ये त्याची डयुटी लागली असुन ती बस एसटी बस स्टॅापवर उभी असतांना त्या बसमध्ये त्याचे ताब्यातील लोखंडी ट्रे व ट्रे मधील एसटी तिकीट ती बसमध्ये ठेवुन तो नैसर्गीक विधी करीता गेला असता तेव्हा कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन एसटी बस मध्ये ठेवलेली तिकीट २१,०४०/—रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पो.स्टे भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एकाचा मृत्यु . :–**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी २०.३० ते २०.४५ वा. दर. यातील फिर्यादीचे मोठे वडील हे सायकल ने नविन टाकळी येथुन शास्त्री चौक भंडारा येथे जात असतांना यातील अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील चार चाकी वाहन हयगयीने व निष्काळजिपने चालवुन फिर्यादीचे मोठे वडील मृतक— मोरेश्वर मारोती पाहुलझगडे वय ६५ वर्ष रा. नविन टाकळी भंडारा यास धडक देवुन त्याचे मरनास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी सोनु गजानन पाहुलझगडे वय ३३ वर्ष रा. भंडारा तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४ (अ) भांदवि. सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) ट्रक चालकांच्या लापरवाहीने,एकाचा मृत्यु . :–**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी १२.०० वा. दर. यातील फिर्यादी व मृतक— देवेंद्र हरीभाऊ भेंडारकर वय ४५ वर्ष रा. चिंघी हे साकोली तहसिल कार्यालया जवळ एसटी बस मधुन उतरुन समोरुन रोड क्रॅास करीत असता नागपुर कडुन येणा—या अज्ञात आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन मृतकास धडक मारुन गंभिर जखमी करुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी धनराज आसाराम पाऊलझगडे वय ३२ वर्ष, रा. खोंबा/गोंडी जि. गोदिंया यांचे तोंडी व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक ११/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, अडयाळ, लाखांदुर व दिघोरी येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ०९ लिटर ९० मिली देशी दारु असा एकुण कि. २,५२५/–रु. चा माल जप्त करण्यात आले आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता